# महाराष्ट्र शासन

## संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - ४०० ००१

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३ (विस्तार - ३३९) ईमेल - dmer.cetit@maharashtra.gov.in


क्र.संवैशिवस/आरोग्य विज्ञान/अनधिकृत संस्था/सीईटी आयटी/ /2022 दिनांक : २९.०९.२०२२

**<u>विहीत प्राधिकरण, क्रेंद शासन आणि राज्य शासनाच्या मान्यता नसलेल्या आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमध्ये प्रवेश न घेण्याबाबत..</u>**

प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ यांचेमार्फत, महाराष्ट्र राज्यातील आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. या अभ्यासक्रमांना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, चिकित्सा परामर्श समिती, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक इत्यांदी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ, मुंबई आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या www.msbnpe.org व www.muhs.ac.in या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/माहिती उपलब्ध आहे.

आरोग्य विज्ञान संस्थामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा त्याअनुषंगिक बाबींकरिता तरतुद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनुधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २००१३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास सुरू करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाकरिता इच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सुचित करण्यात येते की, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, चिकित्सा परामर्श समिती, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ/संस्थामंध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशाकरिता इच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात.

त्याअनुषंगाने सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमात प्रवेशाकरिता इच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी तसेच वर नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यकीय शिक्षण मंडळ व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयास संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

**संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**